(६४)

तात्काळ
कायम विना अनुदान

जा.क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुवि/२००५
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 31 OCT 2005
२७६०८/९९

प्रति
सचिव,
धानिराज धर्मादाव न्यास (ट्रस्ट), १४६/३ चोरडिया गार्डन,
सुतारवाडी रोड, पाषाण, पुणे

**विषय : २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत.**

संदर्भ : १. शासन पत्र क्र. नमाशा/२००५/(६७१/२००५)/माशि-१, दिनांक २१/१०/२००५
२. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/१००२ के/नमाशा/४५१७०/१५-क, दि. २८.१.२०००
३. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. नमाशा/२००५-०६/६१८५०/२००५/३/१५७ दि. / /०५

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | धानिराज धर्मादाय न्यास (ट्रस्ट), १४६/३ चोरडिया गार्डन, सुतारवाडी रोड, पाषाण, पुणे | मोजे वाकड, ता. मुळशी | आठवी | इंग्रजी |

कायम विना अनुदान

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही किंवा विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
३. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २१०३/(५०/०३) माशि-२, दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.
४. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
५. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु. २०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे प्रतिस्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.
६. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
७. संस्थेविरुध्द गंभिर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
८. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
९. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबित नाही.
१०. सदर संस्थेने नवीन शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १० विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसाचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.
करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
आपण सदर संस्थेच्या मूळ प्रस्तावावरुन, सविस्तर पत्यावर वरील शाळा परवानगी देण्याचे विचाराधीन असल्याचे आपले स्तरावरुनही तात्काळ कळविण्यात यावे. मूळ प्रस्तावीत परवानगीचे ठिकाण व माध्यम याबाबत खात्री करावी व वरील अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ - यांना सविनय सादर
३. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२. यांना सविनय सादर

२९०८९/१०

परवानगी वर्ष :- २०११-२०१२
माध्यम : - इंग्रजी
कायम विना अनुदान
(इ.८वी, ९वी, १०वी)

जा.क.शिउसं/ माध्य-३/१२/प्र.मा./पुवि/२०११
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - 15 OCT 2011

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद पुणे

विषय :- कायम विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या इ.७वी पर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ.८वी ते १० वी चे इंग्रजी माध्यमाच्या वर्गांना प्रथम मान्यता प्रदान करणेबाबत..
**धनिराज माध्यमिक स्कूल,वाकड,ता.मुळशी जि.पुणे.**

संदर्भ- १) **शासन निर्णय क्र.नमाशा-२०१०/(९६/२०१०)/माशि-१ दि.१०.०३.२०१०**
२) आपले पत्र क्रमांक जिप/माध्य/२६०८/११ दिनांक ११.१०.२०११
३) **शासन पत्र क्रमांक इंमाशा-२०१०/(३८२/१०)/माशि-१ दिनांक १०.०५.२०११**
४) **शासन निर्णय क्रमांक नमाशा-२०१०/(९६/१०)/माशि-१ दिनांक १४.१०.२०१०**

उपरोक्त विषयासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी विचारात घेऊन **धनिराज चॅरीटेबल ट्रस्ट,एस.नं.१४६/३,टँक रोड,पाषाण,पुणे** संचलित **धनिराज माध्यमिक स्कूल,वाकड,ता.मुळशी जि.पुणे.**या माध्यमिक शाळेस खालील अटींवर आणि तपासणी अहवालातील सर्वच सूचनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याच्या शर्तीवर कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता प्रदान करण्यात येत आहे. **(जून-२०११ पासून तात्पुरती प्रथम मान्यता देण्यात येत आहे.)**

१. नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.
३. विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
४. संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
५. शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
६. विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
७. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
८. सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

इतर अटी :-

**जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.**

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी.व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे.वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ :-१) शासन पत्र क्रमांक याचिका-२००९/प्र.क्र.२४४/ माशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर २००९
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२००९/६४:२६/याचिका,१५ क(८)९३४४
[illegible]

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं.यांची स्वाक्षरी असे.

(धनाजी वुटे )
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
१. मुख्याध्यापक,
धनिराज माध्यमिक स्कूल,वाकड,ता.मुळशी जि.पुणे.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
१. विभागीय सचिव,पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर,पुणे-४११००५

२/- विभागीय मंडळाकडून प्राप्त होणा-या प्रस्तावा संदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचेकडून विद्यालयास मंडळ संलग्नता व नविन सांकेतांक क्रमांक मिळणेबाबतच्या शिफारशी प्राप्त होताच मंडळास तसा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

प्रत माहितीसाठी सादर,
१.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
२.निवडनस्ती.